## <u>रे.क.न. २०/२०२० मधील निशाणी क्रमांक ५ खालील आदेश</u>

वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटप होऊन तुटक होऊन कब्जा मिळणेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादींनी दावा मिळकत विक्री, गहाण, तारण, अगर अन्य कोणत्याही मार्गे तबदील करु नये अगर त्याचेवर बोजा व त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण करु नये अशी प्रतिवादी विरुध्द दावेचे अंतिम निकालपावेतो तुर्तातुर्त मनाई आदेश पारित व्हावा अशी विनंती उक्त अर्जान्वये केली आहे.

**<u>दावा मिळकतीचे वर्णन</u>** –

०३. क।। कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील जमीन–

| अ.क्रं. | जुना सर्व्हे नं. | नविन गट क्रं. | पैकी क्षेत्र<br>हे. आर. | आकार<br>रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १. | ३९६ व ३९७ | २७६ | ००–९०–१<br>पो.ख.००–०२ | १४–०६ |

(यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

**अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

०४. वर नमुद केलेल्या दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे वडिलार्जित मिळकती आहेत. त्यामध्ये वादींचा १/२ कायदेशीर हिस्सा आहे. वादीचे पुर्वहक्कदार रामा कृष्णा नाईक व प्रतिवादींचे पुर्वहक्कदार लकू नाना नाईक यांची १/२ हिस्सेची मालकी कब्जे वहिवाटीच्या मिळकती होय. जुना सर्व्हे नं. ३९६ व ३९७ हे दोन सर्व्हे नंबर एकत्र करुन त्याचा एकत्रीतपणे गट नं. २७६ असा नविन गट नंबर तयार करणेत आला तो दावा मिळकतीचा गट नंबर होय. त्याप्रमाणे सन १९४८ ते १९५९ सालास वादीचे पुर्वहक्कदार रामा कृष्णा नाईक यांचे दावा मिळकतीचे ७/१२ उतारेस नोंद आहे व मयत रामा कृष्णा नाईक याचे पश्चात वादी हे मालक नात्याने दावा मिळकत उपभोगत आहेत.

०५. सन १९४८ ते १९५९ सालास वादींचे पुर्वहक्कदाराची नावाची नोंद असताना त्यावेळच्या महसूल अधिकारी यांचे नजरचुकीने व अनावधानाने त्यांचे नाव नोंद करणेचे राहून गेले. सदर नाव कमी झालेबाबत फेरफार नोंद नाही. तसेच एकत्रीकरण योजना अंमलात व अस्तित्वात आले नंतर वादींचे पूर्व हक्कदारांचे नाव एकत्रीकरण अधिकारी यांनी मालकी, कब्जा व वहिवाटीप्रमाणे नजरचुकीने नोंद केली नाही. सदर मिळकतीमध्ये वादीचे

पुर्वहक्कदारांचे नंतर वादींची त्यामध्ये मालकी, कब्जा व वहिवाट असताना केवळ प्रतिवादींची सदर दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नाव नोंद असलेचा गैरफायदा घेऊन व वादी यांची दावा मिळकत हडप करणेच्या दृष्ट हेतूने प्रतिवादी यांनी दावा मिळकतीतून वादींना बेदखल केले आहे. वादींचा दावा मिळकतीमधील १/२ कायदेशीर हिस्सा डावललेला आहे. सदर प्रतिवादी यांचे कृत्य पुर्णपणे बेकायदेशीर आहे.

०६. वादी यांनी प्रतिवादीकडे दावा मिळकतीमधील त्यांचा १/२ हिस्सा तुटक करुन मागितला असता तो त्यांनी देणेस टाळाटाळ केली आहे. त्यावेळी प्रतिवादी यांनी वादींना तुम्हाला दावा मिळकतीमधील हिस्सा वाटून देणार नाही. तुम्हाला काय करायचे ते करा जावा आणि पुन्हा इकडे येऊ नका नाहीतर परिणाम बरे होणार नाहीत'' असे प्रतिवादींनी वादींचा १/२ हिस्सा देणेस स्पष्टपणे नकार दिला व जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणून वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०७. सदर दावेच्या अंतिम निकालास बराचसा दिनावधी लागणार आहे. सदर दावेचा अंतिम निकाला पावेतो प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई ताकीद होणे आवश्यक आहे.

०८. प्रतिवादी क्रं. २–अ ते ५ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.११ वर दाखल केले आहे. तसेच प्रतिवादी क्रं. १–अ ने नि. १५ वरील पुरसीस प्रमाणे प्रतिवादी क्रं. २–अ ते ५ यांनी दिलेले म्हणणे स्विकारले आहे. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांचा सदरचा अर्ज व कथने ही संपूर्ण चुकीची व दिशाभूल करणारी असून ती प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाहीत. दावा मिळकतीचे स्वरुप वर्ग–२ असे आहे. सदर जमिन प्रतिवादीचे पूर्वहक्कदार कै.नाना बाबाजी नाईक यांना शासनाने लावणी लिलावदार म्हणून दिलेली आहे. सदर मिळकतीच्या इतर हक्कात लायसेन्सी व नियंत्रीत सत्ता प्रकार असा शेरा आहे. तसेच इतर अधिकारामध्ये सक्षम प्राधिकारी पूर्वपरवानगी शिवाय हस्तांतरण बंदी असा शेरा नोंद आहे. त्यामुळे वादी यांनी केलेली सर्व कथने खोटी, चुकीची व विपर्यस्त आहेत.

०९. दावा मिळकत ही शासनाकडून मयत नाना बाबाजी नाईक यांना मिळालेली आहे व त्यांचे पश्चात मयत नानाचे वारस म्हणून त्यांचा मुलगा लखु नाना नाईक यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी दि. ०१.०५.१९५२ रोजी झाली. सदर मिळकत त्यांना सनदी इनाम म्हणून शासनाने दिली होती. त्यानंतर Bombay Merged Territories and Miscellaneous Abolition Act 1955 हा कायदा अस्तित्वात आला व

'इनामे' खालसा झाली. त्यानंतर मयत लखु नाना नाईक यांच्या नावाची नोंद दि. २३.०७.१९५९ रोजी दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी फेरफार क्रं. २५५६ ने झाली आहे.

**१०.** त्यानंतर लखु नाईक हे सन १९६१ दरम्यान मयत झाले त्यांची वंशावळ सदर अर्जात नमुद केली आहे. त्यामुळे सदर वंशावळ पाहिली असता यातील वादी व प्रतिवादी यांचे रक्ताचे नातेसंबंध नाहीत. वादी यांनी जाणुनबुजून दाव्यात वंशावळ नमूद केलेली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. तसेच वंशावळी प्रमाणे आवश्यक ते पक्षकार समाविष्ट केलेले नाहीत. त्यामुळे वादीच्या दाव्याला नॉन जाँईडंर ऑफ नेसेसरीज पार्टीज या तत्वाची बाधा येते.

**११.** प्रतिवादी यांच्या नावांची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी त्यांच्या पूर्वहक्कदाराच्या पश्चात वारसा हक्काने झालेली आहे व दावा मिळकतीत त्यांची त्यांच्या पूर्वहक्कदारापासून शांततामय कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे दावा मिळकतीशी वादी यांचा कोणत्याही प्रकारे संबंध नाही. त्यामुळे दावा मिळकतीतील वादींना हिस्सा प्राप्त होणेचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे वादीचा तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे पैशाचे स्वरुपात भरुन निघणार नाही असे नुकसान होणार आहे. वादींचा अर्ज नामंजूर केलेस

वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही.

**१२.** वादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ? | नकारार्थी |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**१३.** वादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३,२१,२८,३२, ५९,८९ व १०५ सोबत दाखल केलेले कागद पाहण्यात आली त्यातील सदर अर्जाकामी विचारात घेतलेली कागदपत्रे वर्णन यादी खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | वादी व प्रतिवादीचे पूर्व हक्कदारांचे नावचा सन १९४८ ते १९५९ चा स.नं.३९७ चा सातबारा उतारा | ३१.१०.२०१८ | स.शि.नक्कल |
| २. | कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील जुना स.नं.३९६ चा सन १९४८ ते १९५९ चा सातबारा उतारा. | ३१.१०.२०१८ | स.शि.नक्कल |
| ३. | दावा मिळकत गट क्रं. २७६ चा सध्याचा सातबारा उतारा. | ०५.०३.२०२० व २२.०६.२०२० | स.शि.नक्कल |
| ४. | वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार रखमा हिचे नांवचे दावा मिळतीबाबतचे इनाम पत्रक | – | स.शि.नक्कल |

**१४.** प्रतिवादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. २६ व ९३ सोबत दाखल केलेले कागद पाहण्यात आली त्यातील सदर अर्जाकामी विचारात घेतलेली कागदपत्रे वर्णन यादी खालील प्रमाणे..

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | वादीतर्फे ॲड.श्री.बी.एस.पाटील (घरपणकर) यांना पाठवलेले | १४.१०.२०२० | स्थळ प्रत |

| | | | |
|---|---|---|---|
| | नोटीसस उत्तर | | |
| २. | रजि.ए.डी.ने नोटीसीचे उत्तर पाठविलेबाबतची पोष्टीकडील पावती. | १४.१०.२०२० | अस्सल |
| ३. | कसबा कळे येथील फेरफार क्रं. १९२२ | २४.११.२०२० | स.शि.नक्कल |
| ४. | कसबा कळे येथील फेरफार क्रं. २५५६ | २४.११.२०२० | स.शि.नक्कल |
| ५. | कसबा कळे येथील फेरफार क्रं. २६६० | २४.११.२०२० | स.शि.नक्कल |

**१५.** दोन्ही बाजुंच्या दस्तऐवजाचे अवलोकन करता वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेली दस्तऐवज सोबत विश्लेषीत केलेली छायाचित्रे ही भारतीय पुरावा कायदया अंतर्गत तरतुदीनुसार पुराव्यादरम्यान सिध्द होतील तत्पुर्वी ती प्रस्तुत अर्जासाठी विचारात घेण्यात येत नाहीत.

## का र ण मि मां सा

### प्रश्नबिंदू क्रं. १ करिता–

**१६.** वादीने दावा मिळकतीत त्यांचा प्रथमदर्शनी हक्क आहे हे शाबित केले आहे काय ? हे पाहणे गरजेचे आहे. वादीचे कथन असे आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादींची वाडवडीलार्जीत मिळकत आहे. त्यात

वादीच्या पुर्व हक्कदारांचा १/२ हिस्सा होता व आता तो वादीचा आहे. त्या नात्याने ते दावा मिळकत उपभोगतात. वादीने दावा मिळकतीचे स्वरुप वाडवडीलार्जीत हे दर्शविण्यासाठी सन १९४८ ते १९५९ चा सातबारा उतारा नि.३/१ वर दाखल केला.

**१७.** त्याचे अवलोकन करता दावा मिळकत 'सनदी इनाम' वर्ग–२ दर्शवली आहे. सत्ता प्रकार नियंत्रीत दर्शविला आहे. तसेच कब्जेदार सदरी सरकार व प्रतिवादीच्या पुर्वजांचा उल्लेख आहे. यामध्ये वादीच्या पुर्वजांचा नावाची नोंद कब्जेदार सदरी नसून नं.७–अ व १२ ला कुळाने दर्शविली तसेच नि. ३/२ ला सन १९५२–५३ ला वादीच्या पुर्वजांचा ताबा हा गैरहक्काने दर्शविला आहे. अशा पध्दतीने सदर दावा मिळकतीत वादीच्या पुर्वजांचा कब्जा दस्तामध्ये कुळ हक्काने व गैरहक्काने दर्शविल्याचे समोर येते.

**१८.** वादींना दावा मिळकत ही सनदी स्वरुपाची होती हे मान्य आहे. आजरोजी ७/१२ सदरी भोगवटदार सदरी प्रतिवादीच्या नावाची एकमेव नोद आहे. वादीचे कथन की दावा मिळकत ही वडीलार्जीत होती व आहे हे दर्शविण्यासाठी वादीने २८/१ वर वंशावळ दाखल केली आहे. त्याचे अवलोकन करता वादी व प्रतिवादींच्या मुळपुरुष 'बापू' दर्शविले आहे. सदर वंशावळ प्रतिवादीने स्विकारली आहे. त्यात मुळ पुरुषापासून वादीची पिढी ही

सातवी तर प्रतिवादीची पिढी ही आठवी दिसते. तसेच वंशावळीत बरीच नावे सारखी व प्रत्येक पिढीत अढळून येतात.

**१९.** सदर वंशावळ ही रखमाकोम लखू नाईक या महिलेच्या वारसा कामी तयार केली आहे. सदर महिला ही मुळ पुरुष 'बापू' ची ७ वी पिढी आहे. नि. २८/२ वर रखमा हिला दावा मिळकत सनदी प्रकारने दिल्याचे व तिच्या मृत्युपश्चात तिला सरळ वारस नसल्याची नोंद आहे. वादीने सदर रखमाकोम चे ते वारस आहेत व त्याअनुषंगाने दावा मिळकतीत हक्क सांगतात असे कथन केलेले नाही. सबब रखमा बाबतचे मोडी लिपीतील दस्त व भाषांतर केलेले दस्त या क्षणी वादीला कोणतीही मदत करत नाही.

**२०.** याउलट प्रतिवादीने दस्त यांदी नि.९३/१ वर फेरफार क्रं. १९२२ दाखल केला आहे. ज्यामध्ये दावा मिळकतीचा कब्जेदार नाना बाबाजी नाईक मयत झाल्याने वारस मुलगा म्हणून प्रतिवादीचे वडील लखू नाना नाईक याची नोंद झाल्याचे दिसते. तसेच ९३/२ वरील फेरफार क्रं.२५५६ ने गाव सनदी उत्पन्न खालसा झाल्याने प्रतिवादीच्या वडीलांची नावाची नोंद ७/१२ पत्रकी झाल्याचे दिसते. तद्नंतर प्रतिवादीचे वडील लखू मयत झाल्यानंतर प्रतिवादीच्या नावाची नोंद दावा मिळकती संदर्भाने यादी नि.९३/३ फेरफार क्रं. २६६० ने झाल्याचे दिसते. सदरचे फेरफार आज

अखेर आव्हानीत होऊन फेरबदल झालेले नाहीत. याउलट प्रतिवादी वा महसुल खात्याचे नियमानुसार नजराणा रक्कम भरुन वर्ग–२ ची दावा मिळकतीचे स्वरुप वर्ग–१ केले आहे.

२१. वादीने दाखल केले दस्तामध्ये वादी एक ठिकाणी कुळ रकान्यात तर एक ठिकाणी गैरहक्काने दावा मिळती संदर्भाने दर्शवतात व या बाबीचा कोणताही खुलासा वादीचा प्रस्तुत अर्जात करत नाही. तसेच मयत रखमा कोमचे ते वारस आहेत अशी वादीच केस नाही. सबब प्रथमदर्शनी दावा मिळकतीवरील हक्क दर्शविण्यात वादी असमर्थ ठरतात. दाखल वर नमूद विविध तफावत दर्शवण्या–या दस्तामुळे वादी प्रथमदर्शनी केस शाबित करु शकले नाहीत. सबब, मुद्दा क्रं. १ त्यामुळे नकारार्थी नोंदविण्यात येतो.

**प्रश्नबिंदू २ व ३ करीता –**

२२. वादीने प्रथमदर्शनी केस शाबित करण्यात अयशस्वी ठरल्याने त्याचे अपरिमित नुकसान होत आहे हे समोर येत नाही त्यामुळे न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने नाही. सबब, प्रश्नबिंदू क्रं. २ व ३ नकारार्थी नोंदवण्यात येत आहे.

**प्रश्नबिंदू ४ करीता –**

२३. प्रश्नबिंदू क्रं. १ ते ३ चे उत्तर हे वादीच्या हक्कात नसल्याने प्रश्नबिंदू क्र. ४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

२. दावा मिळकती संदर्भात यापूर्वी दिलेला जैसे–थे आदेश रद्द करण्यात येतो.

२. उक्त अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालानंतर होणा–या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घेण्यात यावा.

Neha K.Nagargoje

Digitally signed by Neha K.Nagargoje
Date: 2023.02.20 19:06:05 +0530

(नेहा कों.नागरगोजे)

दि. २०.०२.२०२३. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कळे–खेरीवडे.